# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

(पूर्वीचे सोलापूर विद्यापीठ) (Former Solapur University)

NAAC Accredited-2015 "B" Grade (CGPA-2.62)

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)

Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)

फोन नं. : ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in

ईमेल - bcudaffiliation@sus.ac.in शैक्षणिक, संशोधन आणि विकास (संलग्नता विभाग) विस्तारीत क्रमांक : १२२


जा. क्र. : पुअहोसोवि/संलग्नता/२०१९/ 5555 दिनांक 18 JUL 2019

**प्रथम संलग्निकरण मान्यता पत्र**

**मा. कुलगुरु महोदय यांचे प्राप्तअधिकारात**
**विद्या परिषदेच्यावतीने मान्यता**

प्रति,
**मा. अध्यक्ष,**
सदगुरु स्वामी विज्ञानंद बहुउद्देशिय आणि शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित
श्रीकृष्ण महाविद्यालय, चळे, ता. पंढरपूर,
जि. सोलापूर - ४१३३०४

**विषय :** **शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून सदगुरु स्वामी विज्ञानंद बहुउद्देशिय आणि शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित श्रीकृष्ण महाविद्यालय, चळे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर या महाविद्यालयाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील कला, वाणिज्य व विज्ञान (बी. ए., बी. कॉम. व बी.एस्सी.) भाग - १ या नवीन महाविद्यालयातील विद्याशाखा /अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणाबाबत...**

**संदर्भ :**
१. आपला शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून सदगुरु स्वामी विज्ञानंद बहुउद्देशिय आणि शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित श्रीकृष्ण महाविद्यालय, चळे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर या महाविद्यालयाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील कला, **वाणिज्य व विज्ञान (बी. ए., बी. कॉम. व बी.एस्सी.) भाग - १** या नवीन महाविद्यालयातील विद्याशाखा / अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणासाठी या कार्यालयाकडे प्राप्त झालेला प्रस्ताव.
२. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे, शासन आदेश क्र. मान्यता २०१९/(१०७/१९)/मशि-४, दि. १५/०६/२०१९.
३. मा. विभागीय सहसंचालक (उ. शि.), सोलापूर विभाग, सोलापूर यांचे प्रमाणपत्र क्र.विसंस /उशि/ सोवि/मान्यता/२०१९ /१५२२, दि. १९/०६/२०१७.
४. या कार्यालाचे पत्र क्र.पुअहोसोवि/संलग्नता/२०१९/५०४४, दि. २८/०६/२०१९.
५. दि.०४/०७/२०१९ रोजी प्राप्त झालेला स्थानिक चौकशी समितीचा अहवाल.
६. या कार्यालयाचे अटी पुर्तता करण्याबाबत दिलेले पत्र क्र.पुअहोसोवि/संलग्नता/२०१९/५२००, ५२०१ व ५२०२, दि. ०५/०७/२०१९
७. मा. कुलगुरु महोदय यांची दि.१०/०७/२०१९ रोजीच्या टिपणीस अनुसरुन दिलेली अटी पुर्ततेसंदर्भातील मान्यता.

महोदय,

संदर्भ क्र.०१ अन्वये आपल्या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून कायम विना अनुदानित तत्वावरील कला, वाणिज्य व विज्ञान (बी. ए., बी. कॉम. व बी.एस्सी.) भाग - १ या नविन महाविद्यालयातील विद्याशाखा / अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणाकरिता प्रस्ताव सादर केलेला होता.

संदर्भ क्र. २ व ३ च्या शासन मान्यतेच्या अनुषंगाने, प्रथम संलग्निकरणा संदर्भात संदर्भ क्र.४ अन्वये या कार्यालयाकडून स्थानिक चौकशी नियुक्ती करण्यात आली होती. सदर स्थानिक चौकशी समितीचा अहवाल संदर्भ क्र.५ अन्वये प्राप्त झाला. सदर अहवालातील अटींची पूर्तता करण्याबाबत संदर्भ क्र.६ अन्वये आपणास कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन आपण संदर्भ क्र.७ अन्वये अटीपूर्ततेचा अहवाल सादर करावा. स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या अटींची पूर्णपणे पूर्तता झालेली नाही तथापि, विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११०(२) नुसार विद्या

परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये महाराष्ट्र शासन व स्थानिक चौकशी समिती यांच्या अटी पुर्ततेच्या अधिन राहून आपल्या नविन महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान (बी. ए., बी. कॉम. व बी.एस्सी.) भाग - १ या नविन महाविद्यालयातील विद्याशाखा/अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणासाठी कायम विना अनुदानित तत्वावर खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे.

| संस्थेचे नाव व पत्ता | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | विद्याशाखा | विषय / अभ्यासक्रम | संलग्निकरणाच्या प्रकार | प्रवेश क्षमता | संलग्निकरणाच्या मान्यतेची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| सदगुरु स्वामी विज्ञानंद बहुउद्देशिय आणि शिक्षण प्रसारक मंडळ, घळे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर - ४१३३०४ | श्रीकृष्ण महाविद्यालय, घळे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर - ४१३३०४ | कला | बी. ए. भाग - १ | प्रथम संलग्निकरण | १२० | शैक्षणिक वर्ष २०१९-२० (एक वर्ष) |
| | | वाणिज्य | बी. कॉम. भाग - १ | प्रथम संलग्निकरण | १२० | शैक्षणिक वर्ष २०१९-२० (एक वर्ष) |
| | | विज्ञान | बी.एस्सी. भाग - १ | प्रथम संलग्निकरण | १२० | शैक्षणिक वर्ष २०१९-२० (एक वर्ष) |

अट :-

**बी. ए. भाग -१ कला, बी. कॉम. भाग -१ वाणिज्य व बी. एस्सी. भाग - १ विज्ञान**

१. प्राचार्य व शिक्षक भरतीची प्रक्रिया तात्काळ सुरु करावी.

२. महाविद्यालयात जे विषय सुरु करण्यात आलेले आहेत त्यांची किमान १००००/- रु. ची क्रमिक पुस्तके खरेदी करावेत.

३. ग्रंथपाल, शा.शिक्षण संचालक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची निवड करण्याची प्रक्रिया सुरु करावी.

**बी. एस्सी. भाग - १ विज्ञान**

१. विज्ञान प्रयोगशाळेसाठी रु.२५०००/- साहित्य खरेदी करावेत.

उपरोक्त अटींची पूर्णपणे पूर्तता करुन अटी पूर्तता अहवाल आवश्यक त्या कागदपत्रासह लवकरात लवकर या कार्यालयास सादर करावा. कोणत्याही परिस्थितीत ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत उपरोक्त अटींची पूर्णपणे पूर्तता न केल्यास आपल्या महाविद्यालयाविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

वरील संलग्निकरणाबाबत प्रत्येक अभ्यासक्रमासाठी/विषयांसाठी जास्तीत जास्त किती विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल याबाबत विद्यापीठाने घातलेली मर्यादा आणि इतर अटींचे महाविद्यालयांकडून पालन करण्यात यावे.

आपला,

(म. [illegible])

उपकुलसचिव

टिप :- उपरोक्त अभ्यासक्रमाचे शै.वर्ष २०२०-२१ भाग -१ संलग्नीकरणाचे नुतनीकरण करिता व शै.वर्ष २०२०-२१ भाग -२ चा नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव विहित मुदतीत सादर करावा.

प्रत :-

१. मा. शिक्षण संचालक (उ.शि.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे

२. मा. विभागीय सहसंचालक (उ.शि.), उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर.

३. परीक्षा / पात्रता / शिक्षक / विशेष कक्ष /अभ्यास मंडळ / सांख्यिकी इत्यादी विभाग व एम.के.सी.एल., सोलापूर.